POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025
RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक
# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक
○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-५५ ● मुंबई, शनिवार,२७ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



## २४ तासांत पुन्हा मुसळधार!

### धाराशिव जिल्ह्यांसाठी पुढील २४ तास धोक्याचे, हवामान खात्याचा इशारा

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मराठवाडा विभाग आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. विशेषतः सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये या संततधार पावसामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. या सलग पावसामुळे शेतीत मोठे नुकसान झाले आहे. काढणीला आलेल्या पिकांचे आणि उभे असलेल्या शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकरी हवालदिल झाले आहेत. शेतात पाणी साचल्यामुळे अनेक ठिकाणी पिके कुजून जाण्याची भीती व्यक्त होत आहे. सध्या पावसाचा जोर काहीसा कमी झाला असला तरी, पुढील काही तासांत पुन्हा एकदा जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे, ज्यामुळे नागरिकांची चिंता वाढली आहे. धाराशिव जिल्ह्यामध्ये मध्यरात्रीपासूनच पुन्हा पावसाला सुरुवात झाली असून, अतिवृष्टीचा धोका कायम आहे. सोलापूर जिल्ह्यातील सीना नदीकाठच्या नागरिकांना विशेष सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नदीची पाणी पातळी वाढण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित स्थळी हलण्यास आणि नदीच्या जवळ न जाण्याचे आवाहन केले आहे. धाराशिव जिल्ह्यातून पुन्हा एकदा चिंतेची बातमी समोर येत आहे. मागील काही दिवसांपासून शांत असलेल्या पावसाने मध्यरात्रीपासून जिल्ह्याच्या अनेक भागांत पुन्हा रिपरिप सुरू केली आहे. दाट ढगांमुळे संपूर्ण वातावरणात मोठा बदल जाणवत असून, त्यामुळे पुन्हा एकदा अतिवृष्टीची शक्यता वर्तवली जात आहे. पावसाच्या या पुनरागमनामुळे, ज्या भागांना आधीच अतिवृष्टीचा फटका बसला आहे, तेथे पुन्हा मोठे नुकसान होण्याची भीती आहे. जिल्ह्यातील खालील प्रमुख तालुक्यांमध्ये संततधारेला (सतत पाऊस) सुरुवात झाली आहे. भूम, परांडा,वाशी, कळंब, उमरगा या तालुक्यांतील शेतकऱ्यांसाठी आणि नागरिकांसाठी हा संततधार पाऊस नवीन समस्या घेऊन आला आहे. पुन्हा पाणी साचणे, शेतीत चिखल वाढणे आणि दळणवळणावर परिणाम होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या दोन महत्त्वपूर्ण विभागांना जोडणाऱ्या मार्गावर असलेल्या चांदणी नदीवरील पुलाची अवस्था सध्या अत्यंत धोकादायक बनली आहे. वाकडी गावाजवळील या पुलाचे कठडे पुराच्या जोरदार प्रवाहात वाहून गेले असूनही, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या पुलावरून वाहतूक सुरूच आहे. पुलाचे कठडे तुटल्यामुळे वाहनचालकांसाठी आणि पादचाऱ्यांसाठी अपघाताचा धोका वाढला आहे. पूल कमकुवत झाला असताना आणि सुरक्षा कठडे नसतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाने या गंभीर समस्येकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामस्थांच्या मते, हा पूल अत्यंत वर्दळीचा आहे आणि अपघाताची शक्यता जास्त आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने या पुलाची दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. या परिस्थितीमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर थेट प्रश्नचिन्ह उभे केले आहे. या विभागाला मोठा अपघात झाल्यावरच जाग येणार का? असा जळजळीत सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. सोलापूर शहरात काही काळ मिळालेल्या अल्पविरामानंतर पावसाने पुन्हा एकदा जोरादार हजेरी लावली आहे. या संततधार पावसामुळे सोलापूरमधील परिस्थिती पुन्हा एकदा गंभीर बनली आहे.

## उच्च पद मिळवण्यासाठी प्राध्यापकाने बनवले राष्ट्रीय पुरस्काराचे खोटे पत्र; पोलिसांकडून अटक



**■ पूणे । प्रतिनिधी,**

उच्च पद मिळवण्याच्या लालसेपोटी पुण्यातील एका कॉलेजच्या रसायनशास्त्र प्राध्यापकाने थेट केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून दिला जाणारा प्रतिष्ठित शांती स्वरूप भटनागर पुरस्कार मिळाल्याचे बनावट पत्र तयार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी वीरेंद्र सिंग यादव नावाच्या सहप्राध्यापकाला अटक केली आहे.

केंद्रीय मंत्र्यांची बनावट सही, खोट्या निवडपत्राचा दावा

पुण्यातील वाघोली परिसरातील एका कॉलेजमध्ये असोसिएट प्रोफेसर असलेल्या वीरेंद्र सिंग यादव याला पोलिसांनी अटक करण्यात आली. त्याच्यावर भारतीय न्याय संहिता अंतर्गत फसवणूक (318 (4)) आणि बनावटगिरी (336) सह इतर संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या सुरक्षा अधिकाऱ्यांनी केलेल्या तक्रारीनुसार, मंत्रालयाच्या निदर्शनास आले की प्राध्यापक यादव याची 2025-26 या वर्षासाठी शांती स्वरूप भटनागर पुरस्कारासाठी निवड झाल्याचा दावा करणारे एक पत्र प्रसारित झाले आहे. तपासणीदरम्यान, कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्चच्या अधिकाऱ्यांनी या पत्रावर केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जितेंद्र सिंह यांची बनावट सही असल्याचे आढळले. पोलिसांच्या तपासात उघड झाले की, 2025-26 या वर्षासाठी कोणत्याही व्यक्तीची निवड या विज्ञान पुरस्कारासाठी झालीच नव्हती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रा. यादवने विज्ञान क्षेत्रात उच्च पद मिळवण्यासाठी हे बनावट पत्र तयार केले होते. या प्रकरणाचे तपास अधिकारी उपनिरीक्षक संदीप कारपे यांनी सांगितले की, यादव याला 26 सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या फसवणुकीत इतर कोणाचा सहभाग आहे का, याचाही सखोल तपास सुरू आहे.

## भारतासोबतच्या युद्धाचा धडा पाक शाळेत शिकवणार



**■ नवी दिल्ली। प्रतिनिधी,**

पाकिस्तानने मे महिन्यात भारता सोबत झालेल्या चार दिवसांच्या हवाई संघषार्ची कहाणी शालेय मुलांना शिकवण्याचा घाट घातला आहे. भारताच्या हवाई हल्ल्यात चार दिवसांतच पाकिस्तानने माघार घेतली होती. आता विजय कथा म्हणून या संघषार्चा धडा शालेय अभ्यासक्रमात सामील केला आहे. पाकिस्तानी पाठ्यपुस्तकांमध्ये म्हटले आहे की भारताने पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा पाकिस्तानवर खोटा आरोप केला आहे . ७ मे २०२५ रोजी युद्ध छेडल्याचा दावा केला आहे. या धड्यामध्ये म्हटले आहे की ऑपरेशन बनयान-उन-मर्सूस अंतर्गत पाक हवाई दलाने भारताची २६ लष्करी ठिकाणे आणि हवाई तळ नष्ट केले. ४ राफेल जेट पाडल्याचाही दावा केला आहे. मोठ्या नुकसानीनंतर भारताने युद्धबंदीची भीक मागितली आणि अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीने युद्धबंदी झाल्याचा दावाही करण्यात आला आहे. भारताने हा दावा वेळोवेळी खोडून काढला आहे.

## 'ही तर शिक्षा...'; लडाख हिंसाचारानंतर सरकारने रद्द केला सोनम वांगचूक यांच्या एनजीओचा परवाना

**■ लडाख। प्रतिनिधी,**

गृह मंत्रालयाने (MHA) लडाखमधील हवामान कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्याशी संबंधित असलेल्या एका स्वयंसेवी संस्थेचा FCRA परवाना (परदेशी निधी) तत्काळ प्रभावाने रद्द केला आहे. "देशाच्या सार्वभौमत्वावर" अभ्यास करण्यासाठी स्वीडिश प्लॅटफॉर्मकडून निधी स्वीकारल्याच्या आरोपांसह अनेक नियमांचे उल्लंघन केल्याचे कारण मंत्रालयाने दिले आहे. लडाखमध्ये झालेल्या हिंसाचारानंतर सरकारकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. लेह-लडाखमधील हिंसाचाराला सरकारने सोनम वांगचूक यांचे वक्तव्य जबाबदार असल्याचे म्हटले आहे. MHA ने जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे की, संस्थेने फ्यूचर अर्थ या संस्थात्मक देणगीदाराकडून युवक स्थलांतर, अन्न सुरक्षा आणि सार्वभौमत्व यावर जागरूकता निर्माण करण्यासाठी 4.93 लाख रुपयांचा निधी स्वीकारला.



मंत्रालयाच्या मते, या विशिष्ट कारणांसाठी निधी घेणे हे परदेशी योगदान (नियमन) कायदा, 2010 च्या तरतुदींचे उल्लंघन आहे.

खात्यांमधील अनियमितता आणि MHA चे आक्षेप वांगचूक हे संस्थापक संचालक असलेल्या SECMOL संस्थेचा परवाना रद्द करण्यापूर्वी मंत्रालयाने 10 सप्टेंबर रोजी त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मंत्रालयाने त्यांच्या वार्षिक अहवालात आणि नोटीसला दिलेल्या उत्तरात अनेक विसंगती आढळल्याचे नमूद केले. सोनम वांगचूक यांचे स्पष्टीकरणः ही शिक्षा आहे सोनम वांगचूक यांनी या घडामोडीला दुःखद कहाणी आणि शिक्षा म्हटले आहे. 3.5 लाख रुपये जमा करण्याबाबत स्पष्टीकरण देताना ते म्हणाले की, मी संस्थेला एक नवीन बस भेट दिली होती आणि जुनी बस FCRA निधीतून खरेदी केल्यामुळे ती विकून आलेली रक्कम मला परत देण्याचा संस्थेचा मानस होता. म्हणून ती रक्कम माझ्या नावाने कर्ज म्हणून ऋछफ्अ खात्यात जमा करण्यात आली होती.

मात्र, मी ती रक्कम संस्थेच्या लाभासाठी नंतर सोडून दिली. मी नवीन बस भेट दिली आणि जुन्या बसच्या विक्रीतून आलेले पैसेही संस्थेकडे ठेवले, तरीही मला शिक्षा मिळत आहे., असे ते म्हणाले.

दरम्यान, MHA ने 10 सप्टेंबर पासून लडाखला राज्य दर्जा आणि सहावे वेळापत्रक लागू करण्याच्या मागणीसाठी उपोषणावर बसलेले असलेले वांगचूक यांच्यावर लेहमध्ये झालेल्या हिंसक दंगलीत जमावाला भडकवल्याचा आरोप ठेवला आहे. MHA ने वरील सर्व उल्लंघने लक्षात घेऊन SECMOL चा FCRA परवाना तत्काळ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

## सायबर पोलिसांची मोठी कामगिरीः बनावट शेअर ट्रेडिंग ॲपमध्ये फसवलेले ₹२८.१० लाख तक्रारदारास परत!

**■ मुंबई । प्रतिनिधी,**

Fake Share Trading App मध्ये गुंतवणुक करुन फसवणुक झालेली रुपए २८,१०,५९३/-रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील उत्तन सागरी पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे तक्रारदार श्रीमती. दिव्या यांनी सोशल मिडीया टेलीग्राम ॲपवर Online Share Trading ॲपमध्ये गुंतवणुक करुन नफा मिळत असल्याबाबत जाहिरात पाहिली. तक्रारदार यांनी सदर ॲपमध्ये गुंतवणुक केली. परंतु त्यांना कोणताही परतावा मिळाला नाही. त्यानंतर त्यांची आर्थिक फसवणुक झाल्याचे लक्षात आल्याने सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज सादर केला. सदर तक्रारी अजार्बाबत तात्काळ नोंद घेवुन ऑनलाईन NCCRP Portalअन्वये देखील नोंद घेण्यात आली.




तक्रारदार यांची ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आली. तसेच फसवणुकीच्या व्यवहाराचे अनुषंगाने अधिक तपास करुन तक्रारदार यांची रक्कम वर्ग झालेल्या बँक खात्यांची माहिती प्राप्त करुन संशयीत १५ बँक खात्यांना वारंवार पत्रव्यवहार करुन रक्कम ०८ बँक खात्यात रक्कम थांबविण्याबाबत कारवाई करण्यात आली.सदरची ०८ वेगवेगळ्या बँक खात्यांमधील रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयामध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुकीची रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयात याचिका सादर केलेली, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी मा. न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केले.अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी ०८ बँकेसोबत सातत्याने ०५ महीने पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणूक झालेली रक्कम २८,१०,५९३/- रुपए त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे. तक्रारदार यांची रक्कम परत मिळविण्यात आलया नंतर रक्कम परत केल्याबाबत तक्रारदार यांचे प्रतिनिधी यांना प्रतिकात्मक चेक देवून माहिती देण्यात आलेली आहे. फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी... सोशल मिडीया वरील Telegram Channel, Facebook Instagram यावर दाखविण्यात येणा-या Promotio»»fÔl Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आर्थिक फसवणुक करण्यात येत आहे. Investmenft Online App, Share Market Trading Online अस्त्रस्त्र मध्ये गुंतवणुक करण्यापुर्वी ॲपची पडताळणी केल्याशिवाय गुंतवणुक करु नये. Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा. जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही Online Website/App/ APK files ॲपवर विश्वास ठेवु नये. अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात असतो. आपली वैयक्तिक तसेच आर्थिक व्यवहारासंदर्भात माहिती कोणासही उघड करु नये. ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, सायबर विषयक तक्रारी किंवा ऑनलाईन फसवणूकीबाबतची तक्रार तात्काळ सायबर हेलपलाईन क्रमांक 1930 And/ Or 1945 यावर नोंद करावी, तसेच www. cybercrime.gov.i»»f या वेबसाईटवर भेट देवून देखील तक्रार नोंद करावी. सदरची कामगिरी श्री. संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व. वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक, सुजितकुमार गुंजकर यांचेसह सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोउनि/धनवडे, सफौ/संतोष चव्हाण, मपोहवा/माधुरी धिंडे, मपोअं/अमिना पठाण, मपोअं/स्नेहल पुणे, पोअं/कुणाल सावळे, मसुब/प्रविण सावंत, मसुब/बोरकर सायबर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे. सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांकः १९३०/ १९४५ सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट www.cybercrime.gov.if CYRER AWARENESS CAMPAIGN CE STATION 1930

### हे निरभ्र आकाश म्हणजे चकवा

## मुंबईला 'या' दिवसांसाठी पावसाचा ऑरेंज अलर्ट



**■ मुंबई । प्रतिनिधी,**

हवामान विभागानं महाराष्ट्रात पुन्हा पावसाचा जोर वाढणार असाल इशारा दिलेला असताना सोबतच आणखी एक महत्त्वाचा इशाराही दिला. पावसाचा जोर वाढणार महाराष्ट्रात पुढच्या 24 तासांमध्ये पावसाचा जोर वाढणार असून, मराठवाड्यानंतर आता पावसाचा तडाखा विदभार्ला बसेल असा इशारा हवामान विभागानं जारी केला आहे. तिथं अतिवृष्टीचा इशारा असतानाच मुंबई शहर आणि उपनदगरांमध्ये मात्र पावसानं विश्रांती घेतल्याचं चित्र आहे. बहुतांश परिसरांमध्ये आकाश अगदी निरभ्र असल्यानं दृश्यमानताही सुधारल्याचं पाहायला मिळत आहे. मात्र, हेच निरभ्र आकाश पाहता मुंबईतून पावसानं माघार घेतली असा समज करून घेऊ नये. हे आभाळ चकवा देणारं असून, केंद्रीय हवामानशास्त्र विभाग अर्थात आयएमडीने मुंबईसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

### ऑरेंज अलर्ट

आयएमडीने मुंबई, ठाणे आणि रायगडसाठी सलग दोन दिवस ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. यामध्ये 27 आणि 28 सप्टेंबर दरम्यान काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

### पाऊस कमी झाला असला तरी...

बुधवार, 24 सप्टेंबरपर्यंत शहरात पाऊस कमी झाला असला तरी, आठवड्याच्या शेवटी मात्र त्याची तीव्रता वाढणार असल्याचा इशारा हवामान खात्यानं जारी केला आहे.

### मान्सूनची माघार कधी?

हवामान विभागाच्या पूवार्नुमानानुसार मुंबईतून मान्सून परतण्याची अधिकृत तारीख 8 ऑक्टोबर आहे, मात्र आता याच मुहूर्तावर मान्सून परततो की मुक्काम वाढवतो हे पाहणंही महत्त्वाचं ठरेल.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# हे राज्य बळीराजाचे की बळी घेणार्यांचे?



राज्यातील शेती ही पूर्णपणे निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. पाऊस पडला तर पिके उभी राहतात आणि पाऊस लांबला, थांबला किंवा अति झाला तर पिकांसोबत शेतकरीही कोसळतो. यंदा मराठवाड्यातील परिस्थिती ही ओल्या दुष्काळाची आहे. पावसाचा अतिरेक झाला आहे. पिकांना योग्य र्तहेने वाढीची संधीच मिळाली नाही, जमिनीत पाणी साचले, मुळे कुजली. उभी शेती डोळ्यांसमोर वाहून गेली. अशा वेळी शेतर्कयांना दिलासा देण्यासाठी पीक विमा हा आधारस्तंभ ठरायला हवा होता. मात्र अलीकडे एनडीआरएफ (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी) चे बदललेले निकष इतके किचकट आहेत की, शेतर्कयांच्या तोंडचा घास हिसकावून घेतल्यासारखे झाले आहे. या निकषांनुसार भरपाईची रक्कम ही थेट पीक कापणी प्रयोगावर अवलंबून राहणार आहे. म्हणजेच शेतात किती नुकसान झाले, किती पिके वाहून गेली, जमिनीवर उरलेच नाहीत, याची तातडीने दखल घेतली जाणार नाही. आधी कापणी होईल, मग कापणी अहवाल येईल, मग आकडेवारी तपासली जाईल, त्यानंतरच भरपाई मिळेल. प्रत्यक्षात बळीराजा त्या वेळेपर्यंत जगणार कसा, घरखर्च करणार कसा, कर्जफेड करणार कशी, याचा विचारच केलेला नाही. जुन्या योजनेनुसार स्थानिक आपत्ती, पिके न उगवणे, अतिवृष्टी, गारपीट, कापणीनंतरचे उत्पादन संकट या सगळ्यांवर भरपाई मिळत होती. किमान 33 टक्के नुकसान हे निकष पुरे होताच शेतर्कयांच्या खात्यात मदतीची रक्कम जमा होत असे. आता मात्र फक्त अंतिम कापणी प्रयोगावर भर राहणार असल्याने अतिवृष्टीसारख्या तातडीच्या संकटात विमा कंपन्या हात झटकू शकतात. म्हणजेच, जुन्या योजनेनुसार यावेळच्या अतिवृष्टीत शेतर्कयांना मोठ्या प्रमाणात भरपाई मिळाली असती. पण आता ते सर्वस्वी एनडीआरएफच्या निकषांवर सोपवले गेले आहे. म्हणजेच केंद्राच्या आपत्ती निधीतून किती मिळेल, त्यासाठी किती प्रक्रिया होईल, याच्यावर बळीराजाचे भविष्य टांगले गेले आहे.

विमा कंपन्यांनी मात्र या सगळ्यातून स्वतःला सोडवून घेतले आहे. हा अन्यायकारक बदल शेतर्कयांच्या छाताडावर पाय देऊन केलेला आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी शेतांच्या बांधांवर जाऊन पाहणी केली, शेतर्कयांचे ओले डोळे त्यांनी पाहिले, दुर्दैवी हकीकती ऐकल्या. तरीही प्रत्यक्ष मदतीत पीक विम्याच्या नावाखाली कंपन्यांच्या तिजोंया भरून शेतर्कयांना रिकाम्या हाताने घरी पाठवणे हा फार मोठा नतद्रष्टपणा आहे. ओला दुष्काळ झाल्यावर बियाणे पुन्हा टाकता येत नाही, कारण हंगाम संपलेला असतो. खते, मजुरी, औषधे, पाणी व्यवस्थापन या सगळ्यांवर आधीच कर्ज काढलेले असते. पण विमा नाकारल्यामुळे शेतकरी हताश होतो. बँका आणि सावकार कर्जफेडीसाठी तगादा लावतात, घरखचार्चा ताळमेळ लागत नाही, मुलांच्या शिक्षणावर गदा येते. ओल्या दुष्काळाचा परिणाम हा केवळ शेतातच नाही, तर थेट घराघरात पोहोचतो. शेतकरी कुटुंब मानसिकरित्या खचून जाते. विमा कंपन्यांचे गणित फारच वेगळे आहे. शेतर्कयांनी दिलेला हप्ता आणि सरकारकडून मिळणारी सबसिडी ही कंपन्यांसाठी मोठा महसूल ठरतो. प्रत्यक्ष नुकसानभरपाई मात्र फार कमी प्रमाणात दिली जाते. काही वर्षे तर अशा कंपन्यांना हजारो कोटींचा नफा झाल्याची आकडेवारी आहे. म्हणजे, शेतर्कयांच्या अश्रूंमधूनच या कंपन्या आपली तिजोरी भरत आहेत. हा प्रकार थांबवायचा असेल तर सरकारने पुढाकार घेऊन कठोर निर्णय घ्यायला हवेत. प्रश्न असा आहे की सरकार कोणाच्या बाजूने उभे आहे? शेतर्कयांच्या की कंपन्यांच्या? सरकारने कंपन्यांना कडक अटी लावायला हव्यात.

नुकसानभरपाई ठरवताना गावोगावच्या प्रत्यक्ष पंचनाम्याला प्राधान्य द्यावे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ठीक आहे, पण तो शेतर्कयांच्या सोयीसाठी असावा, शिक्षा करण्यासाठी नव्हे. उदाहरणार्थ, मोबाईलवर फोटो अपलोड करता आला नाही म्हणून शेतर्कयाला विमा नाकारणे ही क्रूरता आहे. त्याऐवजी महसूल खात्याच्या अधिर्कायांनी थेट नोंद करावी अशी सक्ती करायला हवी. सरकारकडे आणखी एक पर्याय आहे. विमा कंपन्यांच्या हातात शेतर्कयांचे भविष्य सोडण्यापेक्षा राज्यस्तरीय पीक आपत्ती निधी निर्माण करणे. या निधीतून थेट नुकसानभरपाई शेतर्कयांच्या खात्यात द्यावी. जर सरकारला वाटत असेल की खासगी कंपन्यांकडूनच विमा घ्यायचा, तर मग त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक आहे. वेळेत नुकसानभरपाई न दिल्यास कंपन्यांवर दंडात्मक कारवाई व्हायला हवी. शेतर्कयांचा विम्यावर विश्वास राहिला नाही तर ही योजना कोसळेल. जेव्हा शेतकरी विम्यातून बाहेर पडतो, तेव्हा तो पूर्णपणे निसर्गाच्या दयेवर राहतो. आधीच हवामान बदलामुळे पावसाचे चक्र विस्कळीत झाले आहे, अनिश्चितता वाढली आहे. अशा वेळी सरकारची जबाबदारी आणखी वाढते. पण आज उलटे चित्र दिसते. कंपन्या सुखावतात आणि शेतकरी दुखावतो. या सगळ्या गोंधळात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, शेतर्कयाला किती मिळाले हा नाही, तर त्याच्या हक्काचा आधार किती हिरावून घेतला हा आहे. सरकारकडून वारंवार हे राज्य बळीराजाचे आहे अशा घोषणा केल्या जातात. प्रत्यक्षात हे राज्य बळी घेणार्यांचेच असल्याचा प्रत्यय वारंवार येतो. पीक विमा म्हणजे शेतर्कयाच्या आयुष्याची किमान हमी. ती हमीच जर कागदी कारवाईत गाडून टाकली तर ते आपत्तीग्रस्त शेतर्कयांना जिवंत गाडण्यासारखे आहे. म्हणूनच आता शेतर्कयांच्या बाजूने उभे राहणे ही केवळ आर्थिक गरज नाही, तर सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे आता शहरी भागातील लोकांनीही शेतर्कयांसाठी आवाज उठवण्याची गरज आहे. कारण शहरात येणारे धान्य, भाजीपाला हा आभाळातून पडत नाही, शेतर्कयांच्या शेतात पिकत असतो.

# विस्मृतीच्या स्मृतिशलाकेचे स्मरण!



विसरता काहीच येत नाही. हे वास्तव आधी नीट स्वीकारावे लागते आणि आपल्यासाठी आपणच अधिक महत्त्वाचे असतो, इतरांचे आपल्याबद्दलचे मत नाही, याची जाणीव जागृत ठेवावी लागते, हा मनोविकारतज्ज्ञाचा सल्ला स्लोअरने नेमका लक्षात ठेवला...

गोष्टी लक्षात राहणे हा रोग असू शकतो, याची जाणीव स्लोअर शहाणेला तेव्हा झाली, जेव्हा त्याने एकदा वर्तमानपत्रात आलेल्या लेखात वाचले, की आपण डोक्यात खूप कचरा साठवतो, ज्याची वेळोवेळी साफसफाई केली नाही, तर तो कुजून मेंदूला पोखरू शकतो. एकविसाव्या शतकाची पहाट उजाडल्यापासून ज्या नव्या संकल्पनांचे वारे वाहायला सुरू झाले, त्याचाच भाग असलेला, हा विस्मृतीचे लाभ या शीर्षकाचा लेख स्लोअर शहाणेने काळजीपूर्वक कात्रण करून जपून ठेवला. विस्मृतीवर असूनही तो का जपून ठेवला, याची एक छोटी गोष्ट आहे, ती अशी...

नको असलेल्या अनेक वस्तू आपण घरात जमा केलेल्या असतात, ज्यांचे गाठोडे बोजड झाले, तरी आपल्याला सोडवत नाही. मनावरही न विसरलेल्या अनेक गोष्टींचे आपण ओझे करून ठेवतो, ज्यामुळे आपले मन नवे विचार, नव्या संकल्पना चटकन स्वीकारत नाही, असे त्या लेखात म्हटले होते. यात असेही म्हटले होते, की जुन्या वस्तू साठवल्याने आपण नव्या वस्तू खरेदी करण्यापासून परावृत्त होत राहतो, जो जागतिकीकरण काळातील अर्थचक्राला चालना देण्यातील एक अडथळा आहे. स्लोअर शहाणे त्या वेळी कॉलेजातून नुकताच समाजवाद, भांडवलशाही आदी संकल्पना शिकून बाहेर पडलेला असल्याने, त्याला हे वाक्य बाजारपेठीय रेटा या प्रवर्गात घालावेसे वाटले. तसे ते त्यात कायमचेही गेले असते आणि त्याचा पुढे आठव अजिबात आलाही नसता; पण ह्यमध्यमवर्ग, त्याचे कप्पे आणि समृद्धीचे नवे पर्व यावर झालेले एक उद्बोधक व्याख्यानही त्याने नेमके त्याच वेळी ऐकल्याने त्याने या लेखाचा साकल्याने विचार करण्याचे ठरवले आणि विचार करायचा आहे, हे विसरू नये म्हणून त्याचे कात्रण जपून ठेवले! व्याख्यानाचा परिणाम असल्याने या लेखाचा विचार करताना स्लोअर शहाणेने दोन कप्पे केले. एक मानसिक पातळीवरचा आणि दुसरा भौतिक. या दोन्ही बाबी आपण स्वतंत्रपणे पाहिल्या, तर काही उलगडे व्यवस्थित होतील, असे त्याला वाटले. आधी त्याने मानसिक पातळीवर झालेली अडगळ तपासायचे ठरवले. लेखात म्हटल्याप्रमाणे, न विसरलेल्या जुन्या गोष्टींचे ओझे काय आहे, हे त्याने आठवायला सुरुवात केली. मित्राने चिडवले होते, तेव्हाच्या प्रसंगाचा तुकडा त्याला स्मृतींच्या एका कप्प्यात सापडला.

आपण त्या वेळी खूप चिडलो होतो, हे स्लोअरला आठवले. कारण काय? तर मित्रांमित्रांतील चिडवाचिडवीच्या वेळी एक मित्र त्याला वेडा म्हटला होता आणि त्याचा राग अजून स्लोअरच्या मनातून गेला नव्हता. असे का झाले असावे, याचा स्लोअरने आता विचार सुरू केला. वेडा ही काही रूढाथार्ने शिवी नाही, मित्रांतही चालू नये, इतकेही ते निंदनीय विशेषण नाही, ते काही उगारलेले शस्त्र नाही किंवा ते डागलेले दूषणही नाही. मग तरी ते दोन अक्षरी - पाहायला गेले, तर क्षुल्लक - विशेषण आपल्याला का इतके टोचत आहे? त्या मित्राशी आताही बोलताना, वागताना त्याची अढी राहिल्यासारखे का मनात रुतून बसले आहे? ते मनावरचे ओझेच; ते आपल्याला का उतरवता येत नाहीये?...स्लोअरला एकामागोमाग एक असे तीन प्रश्न पडले. अशी तिहाई साधली, की प्रश्न उत्तराच्या पूर्णत्वाकडे जातो, असे स्लोअरला माहीत असल्याने तो आता आपल्याला आपले मन काय उत्तर देते, याची वाट पाहू लागला.

जखमेवर चढलेली खपली काढताच सल भळभळून वाहू लागली. स्लोअरच्या लक्षात आले, की त्यात रागापेक्षाही विषादाचा प्रवाह अधिक वेगवान आहे. रूढाथार्ने वेडा असण्याला नसलेली मान्यता आणि शहाणे असूनही किमान जवळच्यांनी, तरी वेडेपणा स्वीकारण्याची आग्रही तोशीस यांतील संघर्षात धारातीर्थी पडलेल्या समंजस स्वीकाराच्या ठिकऱ्या आपल्याला टोचत आहेत, अधूनमधून सारख्या आठवत आहेत, असा निष्कर्ष स्लोअरने काढला. शालेय जीवनात कधी तरी घडलेली ही घटना किती तरी दिवस, महिने, वर्षं आपल्या मनात बिनभिंतींचे घर करून राहिली, असे त्याला वाटले. त्याला अचानक उमगले, की कंपास आणि कर्कटकाशिवाय वर्तुळ काढता येणारे जेव्हा रेषा मोडण्याचा प्रमाद करतात, तेव्हा त्यांना वेडा म्हणतात. स्लोअरच्या या आकलनबिंदूपासून निघणारी सरळ रेषा खरे तर त्याला समंजस स्वीकारापर्यंत घेऊन गेली असती, पण तीही त्याने मोडून वाकडी केल्याने तो एकविसावे शतक उगवल्यानंतर शिरस्ता झालेल्या रस्त्याने मनोविकारतज्ज्ञाकडे गेला.

मनोविकारतज्ज्ञाच्या खोलीबाहेरील प्रतीक्षा कक्षात बसलेला असताना त्याच्या आजूबाजूला बसलेले लोक सर्वसाधारण होते. त्यांना पाहून, मनोरंजनपटांत अशांना उगाच वेगळे दाखवले जाते, हा विचार स्लोअरच्या मनाला स्पर्शून गेलाच. त्यांच्या मनाला नेमक्या कोणत्या जखमा आहेत, हे त्यांच्या चेहऱ्यावरून तरी कळत नव्हते. त्यातील एकाने स्लोअरकडे स्मितहास्याची एक हलकी लकेर भिरकावली. स्लोअरनेही त्याला प्रतिसाद दिला. बाकी सगळे शांत होते, पण विचित्र कोणीच वाटले नाही. मित्र आपल्याला वेडा म्हटल्यामुळे ते तपासायला आपण इथे आलो का, हा क्लिनिकमध्ये शिरताना मनाला चाटून गेलेला त्याचा प्रश्न या समजेच्या बिंदूपाशी गळून पडला. सगळे तसे ठीकच सुरू होते. अशा ठीकपणामुळे स्लोअरला आपण मनोविकारतज्ज्ञाच्या प्रतीक्षा कक्षात बसूनही नॉर्मल विचार करत असल्याचे समाधान वाटले. तेवढ्यात त्याला मनोविकारतज्ज्ञाने आत बोलावले. तो त्यांच्यासमोर बसल्यावर त्याला असे उगाच वाटून गेले, की त्या मनोविकारतज्ज्ञाने आपण आत कसे आलो ते कसे बसलो, इथपर्यंतच्या सर्व हालचालींचा त्याच्या नजरेने एक्स-रे काढून आपल्याबद्दल काही आडाखे बांधून ठेवले आहेत. जेव्हा मनोविकारतज्ज्ञाने स्लोअरला त्याचा प्रॉब्लेम सांगायला सांगितले, तेव्हा तो कथन करताना स्लोअरच्या मनात हा बारीक पूर्वग्रह मेंदूच्या मागे कुठे तरी चिकटून राहिलाच. पण, तरी त्याने मित्र, त्याचे आपल्याला वेडा म्हणणे, त्यामुळे आपल्याला विषाद वाटणे वगैरे कथा व्यवस्थित सांगितली. या संपूर्ण कथनाच्या वेळी मनोविकारतज्ज्ञ आपल्या डोळ्यांत डोळे घालून आपल्याकडे बघतो आहे आणि त्याच्या डोळ्यांत दिलाशाची एक हलकी झाक आहे, याचे मात्र स्लोअरला बरे वाटले. ह्यरुग्णाला डॉक्टर औषधापेक्षाही दिलाशाचे चार शब्द ऐकवून बरे करतो, या वचनाची त्याला आठवण झाली आणि ह्यमनोविकारतज्ज्ञ समोरच्याचे चार शब्द ऐकून घेऊन त्याला मोकळे करतो, असे नवीन वचन तयार करायला हवे, असे त्याला वाटून गेले. तेवढ्यात इतका वेळ ऐकणारा मनोविकारतज्ज्ञ बोलू लागला. त्याने दोन वाक्ये फार महत्त्वाची सांगितली. तो म्हणाला, ह्यगोष्टी विसरायच्या, मनातून पुसून टाकायच्या असे काही मुळात करताच येत नाही. पण, त्या विसरता येत नाहीत, तर त्याबरोबर आणखी एक गोष्ट लक्षात ठेवायची, ती म्हणजे न विसरता येणाऱ्या गोष्टी आपण विसरू शकत नाही, हे आधी नीट स्वीकारणे आणि आपल्यासाठी आपणच अधिक महत्त्वाचे असतो, इतरांचे आपल्याबद्दलचे मत नाही, याची जाणीव जागृत ठेवणे. स्लोअर शहाणेला हे समारोपाचे वाक्य फारच पटले आणि ते नेमके लक्षात ठेवून तो क्लिनिकमधून बाहेर पडला. घरी परतताना त्याला हलके वाटू लागले होते. वाटेत पावसाची मोठी सर आल्याने तर त्याला मनावरचे मळभ सरल्यासारखे वाटले. इतके, की बंगल्यातील आपल्या पहिल्या मजल्यावरील भाड्याच्या घराच्या पायऱ्या चढताना पायऱ्यांच्या कोपऱ्यांत उगवलेले शेवाळही त्याला हिरवी मखमली झालर वाटून गेले. घरात शिरताना मात्र त्याच्या लक्षात आले, की घर जुने झाले आहे, तरी आपण ते बदललेले नाही. ही आयुष्यातून न सुटलेली गोष्ट आहे. पण, त्याला ओझे कसे म्हणायचे? ते तर घर आहे, फक्त बांधकाम नाही. पण, बांधकामाला अवकळा आली आहे, हे खरे. पावसाने भिंती ओलसर झाल्या आहेत, काही ठिकाणी त्यांचे पोपडे उडून गेले आहेत, काही ठिकाणी त्या गळू लागल्या आहेत... छपरातून फरशीवर ठिबकणारे थेंब टपोरे व्हायला लागल्यावर ते पुसावे लागतात. त्यासाठी आजीच्या मऊसूत साडीची केलेली फडकी उपयोगी पडतात. तेवढीच आजीची आठवण. स्लोअरची ही आठवण इतकी ताजी होती, की त्याला आजीसारखा स्मृतिभ्रंशासारखा आजार आनुवंशिकतेने आला असता, तरच ती पुसली गेली असती. विस्मृतीत माणसाला आपण विसरलो आहोत, हे नंतर आठवते तरी; स्मृतिभ्रंशात तीही सोय नाही. स्लोअरला एकदम हलायला झाले आणि मनोविकारतज्ज्ञाकडून निघताना आलेला हलकेपणा घरात शिरताना जड झाला. आजीचा स्मृतिभ्रंश आपल्याला कळलादेखील नाही आणि आपण त्या वागण्याला वेडेपणा म्हणत गेलो, हे आठवून तो ओशाळला. ही अपराधी भावना का मनातून जात नाही, असा विचार करता, त्याला मनोविकारतज्ज्ञाचे वाक्य आठवले, विसरता काहीच येत नाही... मग ते स्वीकारण्यासाठी स्लोअरने रोजनिशी काढली आणि त्यात लिहिले, आजी, तुझी आठवण येते! ता.क. स्मृतीच्या समंजस स्वीकारापुढचे, आपल्यासाठी आपणच महत्त्वाचे या मनोविकारतज्ज्ञाच्या वाक्याचा अन्वयार्थ अशा वेळी कसा लावायचा, हे स्लोअर शहाणेला अजूनही न कळल्याने ते जाणून घेण्यासाठी तो नियमित मनोविकारतज्ज्ञाकडे जायला लागला. एकविसाव्या शतकाचा हाच शिरस्ता होता...

# कॅन्सरचे प्रमाण जगात घटले; भारतात मात्र वाढ!




जगभर कॅन्सरचे प्रमाण आणि मृत्यूदर घटत असताना भारतात त्याची वाढ होत असल्याचे नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या द लॅन्सेट च्या अभ्यासात स्पष्ट झाले आहे. भारतात कॅन्सरची नवीन प्रकरणे आणि मृत्यूदर सातत्याने वाढत असून याला तज्ज्ञांनी गंभीर इशारा मानला आहे. भारतात मधुमेह तसेच उच्चरक्तदबाच्या रुग्णाना योग्य औषधोपचार मिळत नाही किंवा ती मंडळी फारशी गंभीर नसतात. त्याशिवाय तंबाखू,धुम्रपान आणि दारुचे सेवन यामुळेही कॅन्सरच्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. अभ्यासानुसार, भारतातील कॅन्सरचा प्रसार १९९० मध्ये प्रति एक लाख लोकसंख्येमागे ८४.८ इतका होता. तो २०२३ मध्ये १०७.२ वर पोहोचला आहे. याचा अर्थ १५ लाख नवीन प्रकरणे. मृत्यूदर देखील १९९० मधील ७१.७ वरून २०२३ मध्ये ८६.९ वर पोहोचला. म्हणजेच गेल्या वर्षात तब्बल १२.१ लाख रुग्णांचा मृत्यू झाला. त्याचवेळी जगभरातील चित्र वेगळे दिसत आहे.जगभर मात्र कॅन्सरच्या प्रकरणांमध्ये घट झाली आहे. जागतिक स्तरावर १९९० मध्ये २२०.६ इतका असलेला प्रसार २०२३ मध्ये २०५.१ वर आला. मृत्यूदर तर १५०.७ वरून ११४.६ पर्यंत घसरला आहे. या उलट भारतातील वाढती आकडेवारी चिंतेत भर घालणारी ठरत आहे. तज्ज्ञांच्या मते, भारतातील सुमारे ७० टक्के कॅन्सर हे बदलता येऊ शकणाऱ्या कारणांमुळे होतात.

त्यात तंबाखू आणि दारूचे सेवन, अयोग्य आहारपद्धती, शारीरिक हालचालींचा अभाव, उच्च रक्तदाब व मधुमेह यांचा मोठा वाटा आहे. भारतातील उच्च प्रदूषणाची पातळी आणि जीवनशैलीही धोकादायक ठरत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. यातूनच भारतात कॅन्सर वाढताना दिसत असून ही स्थिती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे.भारतात २०२४ मध्ये १५.६ लाख नवीन कॅन्सर रुग्ण आणि ८.७४ लाख मृत्यूंची नोंद झाली आहे. देशभरातील ४३ कॅन्सर नोंदणी केंद्रांवरून मिळालेल्या माहितीनुसार, २०२२ मध्ये १४.१ लाख प्रकरणे आणि ९.१६ लाख मृत्यू झाले होते. दिल्लीस्थित एम्समधील कर्करोगतज्ज्ञांच्या मते फक्त एका दिवशी नो टोबॅको डे किंवा कॅन्सर डे साजरा करून उपयोग होणार नाही. सातत्याने जनजागृती मोहिमा राबवित्यात आल्या पाहिजे.

तसेच कॅन्सरची व्यापक तपासणी व लवकर निदान यावर भर देणे गरजेचे आहे. महिलांमधील स्तनांच्या कर्करोगाबाबत गावपातळीवर जाऊन जागृती व तपासणी करणे आवश्यक आहे. पहिल्या टप्प्यात कर्करोगाचे निदान झाल्यास त्याला अटकाव करणे शक्य असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. त्याचप्रमाणे एचपीव्ही आणि हिपॅटायटिस लसीकरण, हवा सुधारणा, तसेच लवकर तपासणी आणि उपचार यामुळे कॅन्सरचे प्रमाण कमी करता येऊ शकते. जगभरातील कॅन्सरचा दर कमी होत असताना भारतात मात्र त्याचे प्रमाण झपाट्याने वाढते आहे. अशावेळी तंबाखू विरोधी मोहीम व्यापक करण्याची आवश्यकता आहे तसेच अस्वास्थ्यकर जीवनशैलीवर नियंत्रण ठेवली व लसीकरण आणि लवकर निदानावर भर दिल्यासच या वाढत्या आजारावर आळा घालता येईल असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

# हिंसा अयोग्यच; पण का झाली?



लडाखमधील शांततेवर गुरुवारी हिंसाचाराचा ओरखडा उमटला. भाजपचे कार्यालय पेटवले गेले, चार आंदोलकांनी जीव गमावला आणि साधारण ६० जण जखमी झाले. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या पत्रकातून आणि भाजपच्या नेत्यांकडून या हिंसाचाराला पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक आणि स्थानिक काँग्रेस नेते फुन्त्साँग स्टेन्झिंग त्सेपांग यांची चिथावणीखोर भाषणे कारणीभूत असल्याचे आरोप करण्यात आले आहेत. सरकार चर्चेस तयार असूनही उतावीळपणा केला गेला, असे चित्र निर्माण केले जात आहे. पण त्यात तथ्य असू शकते का? गुरुवारी जो हिंसाचार उसळला, तो केवळ गेल्या १५ दिवसांत झालेल्या आंदोलनाचा परिणाम नव्हता. २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीरचे विभाजन होऊन त्यातून लडाख हा स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्यात आला. त्यानंतर ऑक्टोबर २०२० मध्ये झालेल्या लडाख ऑटोनॉमस हिल कौन्सिल या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजपने लडाखला राज्याचा दर्जा देण्याचे आश्वासन दिले होते. ते पूर्ण होत नाही हे पाहून गेल्या पाच वर्षांत वारंवार आंदोलने करण्यात आली. सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीपर्यंत पदयात्राही काढली गेली. आता हिल कौन्सिलची पुढची निवडणूक अगदी तोंडावर आली आहे. येत्या ऑक्टोबरमध्ये ती होऊ घातली आहे. तरीही राज्याचा दर्जा देण्याच्या दिशेने एकही पाऊल उचलण्यात आलेले नाही. कालचा हिंसाचार हा या पाच वर्षांच्या सहनशीलतेचा अंत होता. लडाखवासीय राज्याच्या दर्जाएवढेच किंबहुना काहीसे अधिकच आग्रही आहेत, ते घटनेच्या सहाव्या परिशिष्टात समावेशासाठी. अनुच्छेद ३७० लागू होता, तोपर्यंत लडाखमधील जमिनींच्या खरेदी-विक्रीवर हिल कौन्सिलचे मोठ्या प्रमाणात नियंत्रण होते. आता हे कवच नाहीसे झाले आहे. त्यामुळे आदिवासीबहुल भागांना विशेष अधिकार देणाऱ्या घटनेच्या सहाव्या परिशिष्टात लडाखचा समावेश करण्यात यावा, अशी स्थानिकांची मागणी आहे. पर्यावरणीयदृष्ट्या अतिशय संवेदनशील असलेला आपला भूभाग सुरक्षित राहावा, तिथले हवा-पाणी प्रदूषित होऊ नये, खाणींनी हिमालय पोखरला जाऊ नये, देशाच्या कुठल्या तरी भलत्याच भागासाठी वीजनिर्मिती करण्याची जबाबदारी लडाखवर लादून इथल्या मेंढपाळांच्या उदरनिवार्हावर गदा आणली जाऊ नये यासाठी त्यांना परिशिष्ट-६चे कवच हवे आहे. ही मागणीदेखील अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाही. तरुणांतील संतापाच्या मुळाशी आहे बेरोजगारी. लडाख हा जम्मू-काश्मीरचा भाग होता, तेव्हा राज्य लोकसेवा आयोगाच्या नोकरभरती प्रक्रियेतून काही प्रमाणात तरी संधी उपलब्ध होत्या. मात्र २०१९ पासून इथे राज्य लोकसेवा आयोगच अस्तित्वात नाही. त्यामुळे सुमारे पाच हजार पदे रिक्त आहेत आणि नोकरीच्या प्रतीक्षेत तरुणांचे वय उलटून चालले आहे. असे अस्तित्वाशी निगडित असलेले प्रश्न घेऊन लडाखवासीयांनी गेली पाच वर्षे शांततापूर्ण लढा दिला, पण हिंसेचा मार्ग आजवर स्वीकारला नव्हता. या वेळी आंदोलनाला १५ दिवस झाले होते. त्यात गृह मंत्रालयाने पुढील चचेर्साठी सहा ऑक्टोबर ही तारीख निश्चित केली. उपोषणाला बसलेल्या वयोवृद्धांची प्रकृती खालावू लागली होती. त्यात मंगळवारी दोघांना रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली. पाच वर्षांत एकही मागणी पूर्ण झालेली नाही आणि उपोषणकर्त्यांच्या जिवाचीही सरकारला किंमत नाही, अशी भावना निर्माण झाली आणि हिंसा उफाळून आली.

# माता कात्यायनी

माता कात्यायनी ही दुर्गेची सहावी योद्धा देवी रूप आहे, नवरात्रीच्या सहाव्या दिवशी तिच्या शक्ती आणि वाईटावर विजयासाठी पूजा केली जाते. ऋषी कात्यायन यांच्या कन्या म्हणून जन्मलेल्या, ती तलवार आणि कमळ धारण करते, सिंहावर स्वार होते आणि धैर्य, संरक्षण, यश आणि अडथळे दूर करण्यासाठी, विशेषतः विवाहात तिला आवाहन केले जाते.

मूळ आणि नाव

ऋषी कात्यायन यांची कन्याः तिचा जन्म ऋषी कात्यायन यांच्या कन्या म्हणून झाला, ज्यांनी देवी दुर्गेला आपले मूल म्हणून प्राप्त करण्यासाठी तपस्या केली.

महिषासुराचा नाश करणारीः ती देवांच्या एकत्रित शक्तींमधून म्हशी-राक्षस महिषासुराचा नाश करण्यासाठी प्रकट झाली.

प्रतिमाशास्त्र आणि प्रतीकात्मकता

चार हातः तिचे सामान्यतः चार हातांनी चित्रण केले जाते.

गुणधर्म : ती तलवार आणि कमळ धारण करते.

अभया आणि वरद मुद्राः तिचे हात अभय मुद्रेत (संरक्षण देणारी, भय दूर करणारी) आणि वरद मुद्रेत (वरदान देणारी) आहेत.

सिंहः ती सिंहावर स्वार होते, जी धैर्य, न्याय आणि वाईटाचा नाश यांचे प्रतीक आहे.

चंद्रः तिच्या कपाळावर चंद्रकोर आहे.

पूजा आणि महत्त्व

नवरात्रीः नवरात्रीच्या सहाव्या दिवशी तिचे पूजन केले जाणारे रूप आहे, जे दैवी शक्ती आणि वाईटावर चांगल्याचा विजय दर्शवते.

अडथळ्यांवर मात करणेः भक्त त्यांच्या जीवनातील अडथळे दूर करण्यासाठी, शक्ती मिळविण्यासाठी आणि त्यांच्या करिअर आणि शिक्षणात यश मिळविण्यासाठी तिला प्रार्थना करतात.

वैवाहिक सौहार्द : माता कात्यायनी विशेषतः अविवाहित मुलींना योग्य जोडीदार देण्याचे आणि विवाहित जीवनातील समस्या सोडवण्याचे आशीर्वाद देण्यासाठी पूजनीय आहे.

मंत्रः कात्यायनी मंत्राचा जप केल्याने भक्तांना योग्य जीवनसाथी मिळतो असे मानले जाते.



# नवरात्रीत देवीला अर्पण करा हे एक फुल तुमच्या मनोकामना होतील पूर्ण



नवरात्रीत देवी दुर्गाच्या नऊ रूपांची सर्वजण पूजा करतात. देवीला फुलं आणि हार अर्पण करतात. असं म्हणतात की देवीला लाल रंगाचं जास्वंदाचं फूल खूप आवडतं. जर तुम्ही नवरात्रीत जास्वंदाच्या फुलांचे काही खास उपाय केले तर तुमच्या इच्छा पूर्ण होऊ शकतात. तसेच तुमच्या घरात धन-धान्य वाढू शकतं. जास्वंदाचं फूल देवीला असल्यान लाल रंगाचं जास्वंद देवीच्या पूजेत वापरल्याने शुभ फळ मिळतं. दुर्गा देवीची कृपा तुमच्यावर राहते असे मानतात. चला तर मग जास्वंदाच्या फुलांचे सोपे उपाय काय आहेत ते जाणून घेऊया.

घरात सुख-समृद्धीसाठी असे अर्पण करा देवीला जास्वंदाचं फूल

देवीला लाल रंग प्रिय आहेच मात्र लाल रंगाची फुलं देखील देवीला आवडतात. त्यामुळे लाल रंगाचे जास्वंदाचे फुल तुम्ही नवरात्रीत देवीला अवश्य अर्पण करा. नवरात्रीत देवीच्या मंदिरात जाऊन देवीपुढे उभे राहून मनोभावे आपली इच्छा देवीला सांगा व तिच्या चरणी फुल अर्पण करा. यामुळे तुमच्या घरात सुख समृद्धी राहते. घरात भरभराट होते व देवीची कृपा सदैव तुमच्यावर असते असे मानले जाते. त्यामुळे नवरात्रीत हा उपाय नक्की करा.

धन-धान्य वाढवण्यासाठी असा करा जास्वंदाच्या फुलाचा उपाय

नवरात्रीच्या दिवसात सकाळी लवकर उठा. स्नान करून पिवळ्या किंवा लाल रंगाचे कपडे घाला. दुर्गा देवीची पूजा करा. देवीला जास्वंदाचं फूल अर्पण करताना ते हातात घेऊन 'ओम एम ह्रीं कलीम चामुण्डायै विच्चे' या मंत्राचा जप करा. हा मंत्र 108 वेळा जपा. त्यानंतर फुल देवीला अर्पण करा. असं केल्याने तुमच्या घरात कधीही पैशाची कमी भासणार नाही. तुमची आर्थिक स्थिती सुधारेल.

मनोकामना पूर्तीसाठी असे वहा देवीला जास्वंदाचे फुल

मनोकामनापूर्तीसाठी तुम्हाला हा उपाय नवरात्रीचे नऊ दिवस करावा लागणार आहे. नवरात्रीत रोज सकाळी लवकर उठून स्नान करा. आपल्या देवघरात दुर्गा देवीची मनोभावे पूजा करा. त्यानंतर देवीला रोज एक लाल रंगाचं जास्वंदाचं फूल अर्पण करा. तुमच्या मनात असलेली इच्छा फुल अर्पण करताना देवीला सांगा. दसऱ्याच्या दिवशी वाहिलेली सर्व फुले वाहत्या पाण्यात विसर्जित करा. असं केल्याने तुमची इच्छा पूर्ण होईल. दुर्गा देवीची कृपा तुमच्यावर राहील अशी मान्यता आहे.

नकारात्मक ऊर्जा दूर करण्यासाठी असा करा जास्वंदाच्या फुलाचा उपाय

नवरात्रीत देवी दुर्गाच्या प्रत्येक स्वरूपाचे पूजन केले जाते. यावेळी देवी तिच्या प्रचंड शक्तीमध्ये असते. त्यामुळे नकारात्मकता जर तुमच्यावर असेल तर याकाळात देवी कालीची पूजा करावी. तुम्ही जास्वदींची कळी घ्या फुल उमललेलं नसावं. ती कळी घेऊन कालीमातेच्या मंदिरात जा. देवीला प्रार्थना करा व फुल देवीच्या चरणाशी अर्पण करा. आता हेच फुल तुम्ही घरी घेऊन या जर तुमच्यावर तंत्रबाधा किंवा कोणत्याही प्रकारची नकारात्मकता नजर असेल तर ते फुल तुम्ही स्वतः खा. अन्यथा घरात कोणावर नकारात्मकता असेल तर त्या व्यक्तीला फुल खायला द्या. या उपायाने निश्चित तुमच्यावरील निगेटिव्हिटी दूर होईल असे मानले जाते.

# पांडवानी एका रात्रीत बांधले होते हे मंदिर

एकविरा आई तु डोंगरावरी नजर हाय तुझी कोल्यांवरी.. हे गाणं ऐकताच डोळ्यांसमोर उभे राहतात ते आग्री-कोळी बांधव.. याचं आग्री-कोळ्यांची देवी म्हणजे कार्ल्यात वसलेली एकविरा देवी.. मुंबईपासून 100 किलोमीटर अंतरावर असलेल्या लोणावळा येथील आई एकवीरा देवी मंदिराला नवरात्रीत नक्कीच भेट द्यायला हवी. हे मंदिर महाभारत काळातील आहे. असे म्हटले जाते की, पांडवांनी त्यांच्या वनवासात फक्त एका रात्रीत हे मंदिर बांधले होते. चला तर मग जाणून घेऊयात या मंदिरांची खास वैशिष्टे

आग्रा-कोळ्यांचे देवस्थान

लोणावळा हे नैसर्गिकरित्या अतिशय सुंदर ठिकाण आहे. येथे कार्ला लेणी आहेत, जिथे आग्रा-कोळ्यांचे देवस्थान असलेली एकवीरा देवीचे मंदिर आहे. या मंदिराची खासियत म्हणजे ज्या गुहांच्या शेजारी एकवीरा देवीची पूजा केली जाते, त्या गुहा एकेकाळी बौद्ध धमार्चे केंद्र मानल्या जात होत्या.



पांडवांनी एका रात्रीत बांधले देवीचे मंदिर

महाभारताच्या कथेनुसार, पांडव वनवासात पोहचताच सर्व पांडव बंधू आपल्यावर झालेल्या घोर अन्यायबद्दल बोलू लागले. त्यांचे हे शब्द ऐकून डोंगरात विराजमान झालेल्या एकविरा देवीचे मन हेलावले आणि तिने त्यांना संकटातून बाहेर पडण्यास मदत केली. देवी म्हणाली, हे पांडवपुत्रांनो, मी तुमचे भाग्य बदलू शकत नाही कारण तुमचा जन्म एका महान कायासाठी झाला आहे. पण, मी तुम्हाला या दिवसांतून बाहेर पडण्यासाठी नककीच मदत करू शकते.

देवीचे हे शब्द ऐकताच पांडव देवीपुढे नतमस्तक झाले. त्यानंतर देवीने पांडवांची परीक्षा घेतली आणि म्हटले की जर वनवास सोपा करायचा असेल तर तुम्हाला देवीचे मंदिर बांधावे लागेल, पण या मंदिराचे बांधकाम एका रात्रीत पूर्ण करावे लागेल. एकवीरा आईचे आव्हान स्वीकारून पांडवांनी रात्रभर जागे राहून डोंगराच्या मधोमध हे मंदिर बांधले आहे. मंदिर बांधताच पांडवांनी देवीने हात जोडून तिला मंदिरात येण्यास सांगितले. पांडवांची हाक ऐकून एकविरा देवीने पुन्हा दर्शन दिले आणि वनवासात त्यांना कोणीही ओळखणार नाही, असे वरदान दिले.

एकविरा देवी मंदिरात कसे जायचे ?

एकविरा नेत्र मंदिर पुण्यापासून 60 किमी आणि मुंबईपासून 100 किमी अंतरावर आहे. त्याचबरोबर लोणावळ्यापासून या मंदिराचे अंतर 10 किलोमीटर आहे.

# देवी ललित सुंदरीने शंकराला आपल्या हृदयात दिले होते स्थान



नवरात्रीत देवीच्या नवदुर्गा रूपांचे पूजन केले जातात. नवरात्रीत पंचम तिथीला देवीच्या स्कंदमाता रूपाचे पूजन केले जाते. मात्र याशिवाय नवरात्रीच्या पंचमीला देवी ललितसुंदरीची देखील पूजा करतात. ललिता त्रिपुर सुंदरी ही 10 महाविद्यांपैकी एक आहे. त्यामुळे या देवीची नवरात्रीत पूजा करणे अत्यंत शुभ आणि महत्वाचे मानले जाते. ललिता व्रत केल्याने आयुष्यातील अडचणी दूर होतात. ललिता देवीच्या कृपेने घरात धन, वैभव आणि सुख शांती नांदते अशी मान्यता आहे.

स्त्रियांना अखंड सौभाग्य, मुलांचे सुख आणि वैवाहिक जीवनात आनंद मिळतो अशी मान्यता असल्याने पाहुयात ललित पंचमीला देवी ललिताची पूजा कशी करावी कोणता मंत्र म्हणावा व ललिता देवी आणि भगवान शिवाची कथा नेमकी आहे काय..

ललिता त्रिपुर सुंदरी आणि भगवान शिव कथा

पौराणिक कथेनुसार भगवान शंकराच्या क्रोधाने कामदेव जळून राख झाला. त्या राखेमधून एका राक्षसाचा जन्म झाला. देवी ललिता त्रिपुर सुंदरीने त्या राक्षसाला मारले. देवी सतीचा देह जेव्हा अर्धा जळाला होता त्यावेळी भगवान शंकर तो देह घेऊन तांडव करत होते. तेव्हा भगवान विष्णूंनी आपल्या सुदर्शन चक्राने देवीच्या शरीराचे तुकडे केले. यामुळे शंकरांना खूप दुःख झाले. ललिता त्रिपुर सुंदरीने शंकरांना त्या दुःखातून बाहेर काढण्यासाठी आपल्या हृदयात सामावून घेतले. तेव्हापासून देवीचे नाव ललिता पडले अशी पौराणिक कथा आणि मान्यता आहे.

ललिता त्रिपुर सुंदरी व्रत का करावे

नवरात्रीत ललिता पंचमीच्या दिवशी देवी ललिताची पूजा आणि व्रत करण्याची पद्धत आहे. देवी ललिता मनोकामना पूर्ण करतात अशी मान्यता आहे. तसेच हे व्रत कुमारिका मुलींनी करावे असे सांगण्यात येते. मनपसंत जोडीदार मिळण्यासाठी नवरात्रीतील ललिता पंचमीला हे व्रत करून देवीची विधिवत पूजा केल्यास देवी प्रसन्न होते व मनपसंत वर मिळण्याचा आशीर्वाद देते असे मानतात. तसेच या व्रतामुळे घरात सुख शांती समृद्धी व भरभराट होते असे देखील मानतात.

ललिता त्रिपुर सुंदरी मंत्र

बीज मंत्र : 'ॐ श्रीं ह्रीं क्लीं ऐं सौः ॐ ह्रीं श्रीं क ए ई ल ह्रीं ह स क ह ल ह्रीं सकल ह्रीं सौः ऐं क्लीं ह्रीं श्रीं नमः

सरल मंत्र : 'ॐ ऐं ह्रीं क्लीं सौः श्री ललिताम्बिकायै नमः'। इस मंत्र में 'ऐं' ज्ञान के लिए, 'ह्रीं' शक्ति के लिए, 'क्लीं' आकर्षण के लिए और 'सौः' मुक्ति के लिए है।

पंचदशी मंत्र : 'का एई ला ह्रीं हा सा का हा ला ह्रीं सा का ला ह्रीं'

गायत्री मंत्र : 'ॐ त्रिपुरा सुंदरी विद्महे कामेश्वरी च धीमहि तन्नो देवी प्रचोदयात'

ललिता त्रिपुर सुंदरी पूजाविधी

नवरात्रीत ललित पंचमीच्या दिवशी देवी ललिता त्रिपुर सुंदरीची पूजा केली जाते. यादिवशी सकाळी लवकर उठून स्नान करा. त्यांनतर देवी ललित सुंदरीच्या फोटोची विधिवत पूजा करून देवीला हार फुल फळ धूप दीप अगरबत्ती व नैवेद्य दाखवा. यानंतर देवीच्या मंत्राची माळ करा. वर दिलेल्या कोणत्याही एका मंत्राची माळ तुम्ही देवीसमोर करू शकता.

ललिता त्रिपुर सुंदरी आरती

**श्री मातेश्वरी जय त्रिपुरेश्वरी ।**
**राजेश्वरी जय नमो नमः ॥**
**करुणामयी सकल अघ हारिणी ।**
**अमृत वर्षिणी नमो नमः ॥**
**जय शरणं वरणं नमो नमः ।**
**श्री मातेश्वरी जय त्रिपुरेश्वरी ॥**
**अशुभ विनाशिनी, सब सुख दायिनी ।**
**खल-दल नाशिनी नमो नमः ॥**
**भण्डासुर वधकारिणी जय माँ ।**
**करुणा कलिते नमो नमः ॥**
**जय शरणं वरणं नमो नमः ।**
**श्री मातेश्वरी जय त्रिपुरेश्वरी ॥**
**भव भय हारिणी, कष्ट निवारिणी ।**
**शरण गति दो नमो नमः ॥**
**शिव भामिनी साधक मन हारिणी ।**
**आदि शक्ति जय नमो नमः ॥**
**जय शरणं वरणं नमो नमः ।**
**जय त्रिपुर सुन्दरी नमो नमः ॥**
**श्री मातेश्वरी जय त्रिपुरेश्वरी ।**
**राजेश्वरी जय नमो नमः ॥**

# चोरलेला मनीप्लांट घरात लावावा का?



तुम्ही अनेकदा असं ऐकलं असेल की मनी प्लांट चोरून आणल्याने अधिक धनलाभ होतो, पैशासंबंधित सर्व अडचणी दूर होतात. त्यामुळे बहुतेकजण अशा घरातून मनी प्लांट चोरी करतात ज्या घरावर लक्ष्मीचा वरदहस्त असतो. पण, खरंच असं होतं का? श्रीमंत घरातून मनी प्लांट चोरून आणल्याने लवकर धनसंपत्ती वाढते का? वास्तूशास्त्र याबद्दल काय सांगतं? चला तर मग आज आपण जाणून घेऊयात मनी प्लांट चोरून आणावा का

घरात मनी प्लांट लावल्याने काय होते?

वास्तूशास्त्रामध्ये मनी प्लांटला खूप महत्त्व आहे. हे झाड लावल्याने सुख-समृद्धीचे नांदते असे म्हटले जाते. याशिवाय सकारात्मक ऊर्जेसोबत आर्थिक स्थिती उत्तम ठेवण्यासाठी घरात मनी प्लांट लावा असे सांगितले जाते.

मनी प्लांट चोरी करून लावावा का?

वास्तुशास्त्रानुसार चोरलेले मनी प्लांट कधीही योग्य मानले जात नाही. हे अशुभ सांगितले जाते. असे केल्याने धनलाभ होण्याऐवजी धनहानी होते. चोरी करणे हे चुकीचे काम आहे. त्यामुळे जेव्हा तुम्ही कोणतीही गोष्ट चोरी करून घरी आणता तेव्हा त्याचा सकारात्मक परिणाम मिळत नाही, केवळ नकारात्मक ऊर्जा घरात येते. त्यामुळे मनी प्लांट चोरी करुन आणू नये.

मनी प्लांट लावण्याचे फायदे -

मनी प्लांटला धन आणि संपत्ती आकर्षित करणारी वनस्पती मानली जाते.

मनी प्लांटमुळे जीवनात सकारात्मक ऊर्जेसह लक्ष्मी देवीची कृपा तुमच्यावर राहते.

घरात मनी प्लांट लावल्याने पैशांची समस्या कमी होत जातात आणि सुख-समृद्धी टिकून राहते.

वास्तुनुसार, मनी प्लांट घरात शुभ ऊर्जा आणते.

काही रिसर्चनुसार, मनी प्लांट लावल्याने रक्तदाब कमी होतो आणि थकवा कमी होतो, असेही मानले जाते.

# नवरात्रीत नखं आणि केस का कापत नाहीत?



आदीशक्तीची आराधना, मातेच जागक यामध्ये भक्त तल्लीन झालेले आहेत. या महापर्वात भक्तगण नऊ दिवस व्रत, पूजा आणि साधनेत लीन असतात. व्रतवैकल्य, साधना याद्वारे मातेचा कृपाशिर्वाद मिळावा यासाठी ते प्रयत्नशील असतात.

व्रत आणि पूजा या व्यतिरिक्त नवरात्रीच्या दिवसात अनेक नियमांचे पालन केले जाते. यातील एक नियम म्हणजे नवरात्रीच्या दिवसात केस आणि नखं कापणे वर्ज मानलं गेलं आहे. नवरात्रीत बहुतेक सर्व भक्तगण या नियमाचे पालन करतात परंतु त्यामागचे कारण त्यांना माहित नसते. धार्मिक मान्यतेनुसार यामागे अनेक कारणे आहेत ज्यांचा संबंध थेट भक्तांची साधना आणि भक्ती सोबत जोडलेला आहे. या नियमांचे पालन केले नाही तर देवी रुष्ट होते आणि व्रताचे पूर्ण फळ मिळत नाही असे म्हणतात. चला तर जाणून घेऊया, नवरात्रीत केस आणि नखे कापणे का वर्ज मानले गेले आहे.

देवीचे आगमन

पौराणिक मान्यतांनुसार नवरात्रीच्या पहिल्या दिवशी कलश स्थापनेनंतर दुगार्मातेचे आगमन होते आणि पुढील नऊ दिवस तीचा आपल्या घरात असतो. यावेळी घरामध्ये सात्विकता आणि पवित्रता राखणे अत्यंत महत्वाचे असते. या दिवसांमध्ये भक्तगण केस आणि नखे कापणे टाळतात जेणेकरून त्यांचे पूर्ण लक्ष देवीच्या साधनेत, आराधनेत आणि सेवेत केंद्रित करता येईल.

तंत्र साधना आणि तामसिक ऊर्जा

नवरात्रीचे दिवस हे साधना आणि सिद्धीसाठी अत्यंत शक्तिशाली असल्याचे मानले जाते. तंत्र शास्त्रानुसार केस आणि नखांचा संबंध तामसिक (नकारात्मक) ऊजेर्शी असतो. या नऊ दिवसात जेव्हा साधक आपल्या आध्यात्मिक उजेर्ला जागृत करण्याचा प्रयत्न करत असतो तेव्हा केस किंवा नखे कापल्यामुळे, शरीरात तामसिक ऊजेर्चा प्रभाव वाढू शकतो, ज्यामुळे साधनेत विघ्न निर्माण होतो असे सांगितले जाते.

भक्तीमध्ये एकाग्रतेचं प्रतीक

केस आणि नखे न कापणे एका प्रकारे तपस्या आणि साधेपणाचे प्रतीक असते. या नऊ दिवसांमध्ये भक्त आपल्या शरीराच्या शृंगारात आणि इतर कामांमध्ये वेळ न घालवता दुर्गा मातेच्या भक्तीत लीन असतो. हा नियम व्यक्तीला शारीरिक शृंगारपासून दूर ठेवतो त्यामुळे त्याची एकाग्रता वाढते आणि त्याची सर्व ऊर्जा ही आध्यात्मिक कार्यासाठी उपयोगात आणली जाते.

संसगार्पासून बचाव करण्यासाठी

दरम्यान आधीच्या काळाच सध्या उपलब्ध असलेली सुरक्षित उपकरणं नव्हती. नख किंवा केस कापताना शारीरिक इजा होण्याची शक्यता होती ज्यामुळे संक्रमण होण्याची संभावना असायची. व्रतादरम्यान शरीराची रोग प्रतिरोधक क्षमता थोडी कमी होते. अशातच कुठल्याही प्रकारच्या संक्रमण तसेच संसगार्पासून बचाव करण्यासाठी या नियमाचे पालन केले जायचे असेही बोलले जाते. पण ही परंपरा आजही आस्थेचा एक महत्वपूर्ण भाग आहे. यावरूनच तुम्हाला समजलं असेल की नवरात्रीत नखं आणि केस कापणे का वर्ज्य मानले जाते.

# अवैध बांधकामांवर कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी का नाही केली?; हायकोर्टाचा एसआयटीला सवाल

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मालाड येथील मढ बेटावर बनावट व खोट्या कागदपत्रांच्या आधारे बंगल्यांचे बांधकाम करण्यात आले. हे बांधकाम बेकायदेशीर असल्याचे मान्यही केले. तरीही, याप्रकरणी कारवाई करण्यात आली नाही. अवैध बांधकामांवर कारवाई न करणाऱ्या पालिका अधिका[ऱ्]यांची चौकशी का केली नाही?, असा सवाल करत मुंबई उच्च न्यायालयाने याप्रकरणाचा तपास करण्यासाठी नियुक्त केलेल्या एसआयटीला गुरुवारी फैलावर घेतले.



मुंबई महापालिका सहकार्य करत नसल्याची बाब एसआयटीने न्या. रेवती मोहिते डेरे व न्या. संदेश पाटील यांच्या खंडपीठासमोर आणली. न्यायालयाने त्यासाठी पालिकेच्या पी प्रभागाच्या अधिकाऱ्यांना हजर राहण्याचे निर्देश दिले. त्याशिवाय मुंबई उपनगर जिल्हाधिकारी (अतिक्रमण विभाग) यांनाही न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश दिले. याचिकाकर्ते वैभव ठाकूर यांच्या वतीने ॲड. अभिनंदन वग्यानी यांनी न्यायालयाला सांगितले की, एसआयटीने या घोटाळ्याप्रकरणी आरोपपत्र दाखल केले आहे. या आरोपपत्रात बंगला बांधलेल्या एका व्यक्तीने आपण बेकायदेशीरपणे बंगला उभारल्याचे मान्य केले. तसेच, त्याने त्यासाठी एजंट आणि पालिकेच्या अधिकाऱ्यांना पैसे दिल्याचे मान्य केले. संबंधित एजंट, पालिका अधिकारी यांची नावे व पैसे दिल्याचे पुरावेही त्याने एटीएसला दिले. तरीही, एटीएसने संबंधित लोकांना ताब्यात घेतले नाही.

पुरावे असूनही अधिकाऱ्यांना अटक नाही

एटीएसच्या तपासावर न्यायालयाने तीव्र नाराजी दर्शवली. एटीएस काय करत आहे? पुरावे असूनही अधिकाऱ्यांना अटक केली नाही. किमान चौकशी तरी करायला हवी होती. बांधकामांवर कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी का केली नाही? अशा शब्दांत न्यायालयाने एटीएसला फटकारले. त्यावर एटीएसने पालिका सहकार्य करत नसल्याची तक्रार न्यायालयाकडे केली.

नेमके काय प्रकरण?

मढ बेटावर भूमि अधिलेख कार्यालयाचे १९६७ चे बनावट नकाशे वापरून कोट्यवधी रुपयांचा सीआरझेड घोटाळा करण्यात आल्याची बाब ठाकूर यांनी याचिकेद्वारे उघडकीस आणली. या घोटाळ्याची गंभीर दखल घेत न्यायालयाने ऑक्टोबर २०२४ मध्ये तपास करण्याकरिता एसआयटी स्थापन केली. त्या प्रकरणात चार जणांना अटक करण्यात आली.

## शहर विद्रुप करणारे ८९० बॅनर्स पोस्टर्स झेंडे हटवले



■कल्याण। प्रतिनिधीः

कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी दिलेल्या सक्त निर्देशांनुसार महापालिकेच्या सर्वच प्रभागांत शहर विद्रुपीकरण करणारे एकुण ८९० बॅनर्स, पोस्टर्स व झेंडे काढण्याची कारवाई काल दिवसभरात करण्यात आली. यामध्ये अ प्रभागात ३८ बॅनर्स, ८ पोस्टर्स व १० झेंडे काढण्यात आले. ब प्रभागामध्ये १२० बॅनर्स व पोस्टर्स काढण्यात आले. क प्रभागामध्ये ५२ बॅनर्स व पोस्टर्स काढण्यात आले. जे प्रभागामध्ये १५ बॅनर्स, १४ पोस्टर्स व २० झेंडे काढण्यात आले. ड प्रभागामध्ये ८२ बॅनर्स व ३ झेंडे काढण्यात आले. फ प्रभागामध्ये ३० बॅनर्स, ३३ पोस्टर्स व ३० झेंडे काढण्यात आले. ह प्रभागामध्ये १०५ बॅनर्स काढण्यात आले. ग प्रभागामध्ये ५० बॅनर्स, २० पोस्टर्स व ४० झेंडे काढण्यात आले. आय प्रभागामध्ये ८० बॅनर्स व पोस्टर्स काढण्यात आले. ई प्रभागामध्ये १४० बॅनर्स काढण्यात आले. ही कारवाई यापुढेही नियमित स्वरूपात सुरू राहणार असून अनधिकृत रित्या लावण्यात आलेले सर्व पोस्टर्स, होर्डिंग, बॅनर्स संबंधितांनी स्वतःहून काढून घ्यावेत आणि आपले शहर स्वच्छ, सुंदर आणि विद्रुपतेच्या विळख्याबाहेर ठेवण्यासाठी महापालिकेत सहकार्य करावे असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे.

## लोकल ट्रेनमध्ये महिलेशी असभ्य वर्तन

■मुंबई। प्रतिनिधीः

विरारझदादर जलद लोकल ट्रेनमध्ये महिलांच्या डब्यात जबरदस्तीने घुसण्याचा प्रयत्न करून शिवीगाळ करणाऱ्या तरुणाविरोधात बोरीवली रेल्वे पोलिसांनी १३ दिवसांनी गुन्हा दाखल केला आहे. ही घटना ११ सप्टेंबर रोजी विरार-दादर लोकलमध्ये घडली होती. या कृत्याची चित्रफित समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर लोकल ट्रेनमधील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. ११ सप्टेंबरला काय घडले? विरारमध्ये राहणाऱ्या स्वरा भोसले या ११ सप्टेंबर रोजी संध्याकाळी अंधेरीला जाण्यासाठी निघाल्या होत्या. त्यांनी विरार स्थानकातून संध्याकाळी ६ ची विरार- दादर लोकल पकडली.




त्या ट्रेनच्या पहिल्या महिला डब्यात (चर्चगेट बाजूने) प्रवास करत होत्या. महिलांच्या डब्यात तुरळक गर्दी होती. मिरा रोड स्थानक गेल्यानंतर महिलांच्या डब्याशेजारी असलेल्या मालवाहू (लगेज) डब्यात चढलेल्या तरुणाने महिलांच्या डब्यात डोकावून अश्लील शेरेबाजी करायला सुरुवात केली. खिडकीजवळ बसलेल्या तीन तरुणी या प्रकाराने घाबरून दुसरीकडे जाऊन बसल्या. त्यानंतर त्या तरुणाने रागारागाने लोकलच्या डब्याच्या पत्र्यावर जोरजोराने बुक्के मारायला सुरुवात केली.या सर्व प्रकारामुळे महिलांच्या डब्यात भितीचे वातावरण पसरले होते.

घटनेचे चित्रिकरण प्रसारित महिलांनी रेल्वे हेल्पलाईनलाही फोन केला. मात्र मदत मिळाली नाही. अंधेरी स्थानक येईपर्यंत हा प्रकार सुरू होता. महिलांनी या संपूर्ण घटनेचे चित्रीकरण केले. त्या विकृत व्यक्तीने आम्हाला अश्लील भाषेत शिवीगाळ केली, गैरवर्तन केले. त्याने हात-पायाने डब्याचे दार आणि खिडकी ठोकून महिलांमध्ये भीती निर्माण केली. माझ्यासह इतर महिलांनीही मदत क्रमांकावर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण जवळपास १५ मिनिटे कॉल लागत नव्हता. आम्ही अनेक महिला होतो. तरीसुद्धा डब्यात भीतीचे वातावरण होते. जर एखादी महिला एकटी प्रवास करत असती तर काहीही अनर्थ घडू शकला असता, असे स्वरा यांनी सांगितले.

कुठला गुन्हा दाखल ?

या घटनेनंतर तब्बल १३ दिवसांनी स्वरा यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर बोरीवली रेल्वे पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ७९ (स्त्रीच्या शीलाचा अपमान करणारे किंवा तिच्या गोपनीयतेत घुसखोरी करणारे शब्द, कृती, हावभाव) तसेच रेल्वे कायद्यातील कलम १४५(ब) (रेल्वेच्या परिसरात त्रास देणे, अश्लील वर्तन करणे, किंवा शिवीगाळ करणे) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दिंडोशी गोरेगाव मधील बेस्ट प्रवाशांना दिलासा; मिनीबसऐवजी मोठ्या बसगाड्या



■मुंबई। प्रतिनिधीः

गोरेगाव स्थानकापासून आत सुमारे दोन अडीच किलोमीटर अंतरावर असलेल्या दिंडोशी परिसरातील नागरिकांना आता बेस्ट प्रवासात दिलासा मिळणार आहे. गोरेगाव बस स्थानक (पूर्व) येथून बेस्टच्या मिनीबस ऐवजी आता मोठ्या बसगाड्या सोडण्यात येणार आहेत. तसेच गाडयांची संख्याही वाढवण्यात आली आहे. त्यामुळे दिंडोशी, नागरीनिवारा परिसरात राहणाऱ्या नागरिकांचा बसचा प्रवास सुकर होणार आहे. पश्चिम उपनगरातील गोरेगाव स्थानकापासून दिंडोशी हे अंतर खूप जास्त आहे. दिंडोशी येथून गोरेगाव स्थानकात येण्यासाठी किंवा स्थानकातून दिंडोशीला जाण्यासाठी तेथील रहिवाशांना खूप त्रास सोसावा लागतो. या अंतरासाठी रिक्षाचे भाडे सर्वसामान्यांना परवडणारे नाही. तसेच बसगाड्यांची संख्याही कमी असल्यामुळे अनेकदा बसची वाट पाहत ताटकळत उभे राहावे लागते. बसची संख्या कमी असल्यामुळे व लहान आकाराच्या बसेसमुळे अनेक प्रवाशांना बसायला मिळत नाही. उभ्यानेच प्रवास करावा लागतो. तर हे अंतर चालत गाठायचे ठरवले तर त्याला ४० ते ४५ मिनिटे लागतात. त्यामुळे दिंडोशी परिसरातील नागरिकांना रोज कामानिमित्त प्रवास करणे हे कठीण झालेले आहे. मात्र आता गोरेगाव ते दिंडोशी मार्गावर मोठ्या बसगाड्या देण्यात येणार असल्यामुळे या रहिवाशांना दिलासा मिळाला आहे.

दिंडोशीचे शिवसेना (ठाकरे) पक्षाचे आमदार सुनील प्रभू यांनी सांगितले की, गोरेगाव बस स्थानक (पूर्व) येथील चार मिडी गाड्या केंद्र शासनाच्या धोरणानुसार भंगारात जाणार आहेत. त्यामुळे प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीचा विचार करून पयार्यी व्यवस्था करण्यात आली आहे.

## आहार मार्गदर्शन, अभ्यासक्रम, प्रशिक्षणासाठी 'न्युट्रिडेक'... काय आहे ही संकल्पना?




■पुणे। प्रतिनिधीः

पोषणयुक्त आहारासाठीचा सल्ला आणि पोषणआहार अभ्यासक्रमांचे शिक्षण आता एकाच ठिकाणी घेणे शक्य होणार आहे. कर्वे रस्ता येथील एसएनडीटी गृहविज्ञान महाविद्यालयात न्यूट्रिडेक (न्यूट्रिशन अँड डाएट एज्युकेशन सेंटर) या केंद्राची स्थापना करण्यात आली असून, या केंद्राद्वारे नागरिकांना पोषणयुक्त आहाराबाबतचे मार्गदर्शन, वैद्यकीय प्रशिक्षण, आहार नियोजन, समुपदेशन, क्लिनिकल न्यूट्रिशन याविषयी प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमात एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. उज्वला चक्रदेव, राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानाचे प्रकल्प संचालक डॉ. राजेंद्र भारूड यांच्या हस्ते न्यूट्रिडेक केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. संकुल समन्वयक प्रा. शीतल मोरे, प्राचार्य डॉ. गणेश चव्हाण, प्राचार्य भरत व्हनकटे, प्रा. वीरेंद्र नगराळे, प्रा. सचिन देवरे, प्रा. सुभाष पाटील, प्रा. विलास जाधव, डॉ. भास्कर इगवे, प्रा. रचना शिखरे या वेळी उपस्थित होते. पोषण व आहाराविषयी समाजात जागृती करण्यासाठी एसएनडीटी महिला विद्यापीठ सातत्याने कार्यरत आहे. या केंद्रामुळे विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षण मिळेल आणि समाजालाही थेट फायदा होईल, असे प्रा. चक्रदेव यांनी सांगितले. आरोग्य आणि पोषणाबाबत विद्यापीठाने सुरू केलेला प्रयोग महत्त्वपूर्ण आहेत. या माध्यमातून पोषण अभियानास चालना मिळण्यास मदत होईल, असे डॉ. भारूड यांनी सांगितले. न्यूट्रिडेक हे केंद्र समाजासाठी पोषण सल्ला सेवा केंद्र आणि क्लिनिकल ट्रेनिंग सेंटर म्हणून कार्यरत असणार आहे. तसेच, पदवी, पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थिनींना डाएट नियोजन, समुपदेशन, क्लिनिकल न्यूट्रिशन याबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. स्थानिक समुदायालाही परवडणाऱ्या दरात, तथ्यावर आधारित आहार मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

## एक दिवसांचे वेतन अतिवृष्टीग्रस्तांसाठी, अभियंत्यांच्या संघटनेचे पालिका आयुक्तांना पत्र


■मुंबई। प्रतिनिधीः

महाराष्ट्रामध्ये विशेषतः मराठवाडा विभागामध्ये मुसळधार पाऊस झाल्याने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना व पूरग्रस्तांना मुंबई महापालिकेच्या अभियंत्यांनी आर्थिक मदत करण्याचे ठरवले आहे. अभियंत्यांनी आपले एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधी साठी देण्याचा निर्णय घेतला आहे. अतिवृष्टीमुळे मराठवाडामध्ये अभूतपूर्व पूरपरिस्थिती उद्भवली आहे. अशीच परिस्थिती विदर्भ, नाशिक, सोलापूरसारख्या भागामध्येदेखील निर्माण झाली आहे. अतिवृष्टीमुळे



अनेक गावांचा संपर्क तुटला असून, नागरिकांची घरे पाण्याखाली गेली आहेत. हातातोंडाशी आलेल्या पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून घरे, संसार, शेती सगळं काही डोळ्यासमोर वाहून गेलं आहे. पूराच्या पाण्यात सारेकाही वाहून गेल्यामुळे या भागातील अनेक कुटुंबांची दसरा दिवाळी होऊ शकणार नाही. महाराष्ट्रातील पूरस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या व पूरग्रस्त बांधवांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय महानगर पालिकेतील अभियंत्यांनी घेतला आहे. म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशनने पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पत्र लिहिले आहे. या पत्रात संघटनेचे कार्याध्यक्ष रमेश भुतेकर यांनी म्हटले आहे की, अभियंत्यांनी आजवर जपलेल्या सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून महानगर पालिकेतील अभियंते आपला एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधी साठी देऊ इच्छितात.

## मध्य रेल्वेचे वेळापत्रक शनिवारी विस्कळीत होणार; भायखळा, शीव येथील पायाभूत कामासाठी ब्लॉक



■मुंबई। प्रतिनिधीः

मध्य रेल्वेच्या शीव आणि भायखळा स्थानकावर पादचारी पुलाच्या तुळया बसवण्यासाठी दोन विशेष ब्लॉक घेण्यात आले आहेत. शनिवारी रात्रकालीन हे ब्लॉक असतील. या ब्लॉकमुळे उपनगरीय रेल्वे सेवा विस्कळीत होईल. भायखळा स्थानकावर पादचारी पुलाचे ४ स्टील गर्डर्स बसवण्यासाठी ११० मेट्रिक टन रोड क्रेन वापरून आणि शीव उड्डाणपुलाजवळ पादचारी पुलाचा ४० मीटर स्पॅन बसवण्यासाठी २५० मेट्रिक टन रोड क्रेन वापरून दोन विशेष वाहतूक ब्लॉक घेण्यात आले आहेत.

ब्लॉक पहिला

ब्लॉकची तारीख - शनिवार रात्रकालीन ब्लॉक

ब्लॉकची वेळ - शनिवारी रात्री १२.३० ते पहाटे ४.३० पर्यंत

वाहतूक ब्लॉक विभाग - भायखळा ते परळ दरम्यान अप व डाऊन धिम्या व जलद मार्गावर

ब्लॉक दुसरा

ब्लॉकची तारीख - शनिवार रात्रकालीन ब्लॉक

ब्लॉकची वेळ - शनिवारी रात्री ०१.१० ते पहाटे ४.१० पर्यंत

वाहतूक ब्लॉक विभाग - दादर ते कुर्ला दरम्यान अप व डाऊन धिम्या आणि जलद मार्गावर

उपनगरीय रेल्वे सेवेवर होणारे परिणाम

- दादर येथून रात्री १०.१८ या वेळेत सुटणारी दादर- कुर्ला लोकल रद्द राहील.
- कल्याण येथून रात्री ११.१५ या वेळेला सुटणारी कल्याण- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस लोकल रद्द राहील.
- कसारा येथून रात्री १० सुटणारी कसारा - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस लोकल ठाणे येथे रात्री ११.४९ अंशतः रद्द होईल.
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून रात्री १२.२४ या वेळेत सुटणारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस -ठाणे लोकल रद्द राहील.
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून पहाटे ४.१९ या वेळेत सुटणारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस -कसारा लोकल ठाणे येथून ५.१४ अंशतः रद्द होईल.

## अर्जंट बेड, एम्बुलन्स हवी? एका क्लिकवर घ्या माहिती; मुंबईत प्रायोगिक तत्त्वावर सुविधा



■मुंबई। प्रतिनिधीः

महापालिकेच्या कोणत्या रुग्णालयात किती बेड शिल्लक आहेत, बाह्यरुग्ण (ओपीडी) कक्ष किती वाजेपर्यंत सुरू असतो, रुग्णवाहिका उपलब्ध आहेत का, नसतील तर किती वेळेत उपलब्ध होऊ शकेल, अशी विविध स्वरुपाची माहिती नागरिकांना पालिकेच्या पोर्टलवर आणि चॅटबॉटच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. कूपर रुग्णालयात प्रायोगिक तत्त्वावर हा प्रयोग यशस्वी ठरल्यानंतर अन्य रुग्णालयांत ही सुविधा उपलब्ध असेल, असे पालिकेकडून सांगण्यात आले. कूपर रुग्णालयात रुग्णांना उंदीर चावल्याचे प्रकरण तसेच बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर मधील विविध मुद्द्यांवर तसेच अन्य रुग्णालयांतील सेवा-सुविधा, मनुष्यबळ उपलब्धता, झीरो प्रिस्क्रिप्शन योजना, भविष्यात उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सेवा आदी विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी पालिकेच्या आरोग्य विभागाचे उपायुक्त शरद उघाडे तसेच नायर रुग्णालयाचे अधिष्ठाता संजय मोहिते यांनी गुरुवारी वातालर्ाप अयोजित केला होता. पालिकेच्या अन्य चार रुग्णालयांप्रमाणे केईएम मध्येही प्रायोगिक तत्त्वावर एचएमआयएस प्रणाली सुरू करण्यात येणार आहे.

या प्रणालीद्वारे रुग्णांच्या नोंदी तसेच त्यांची वैद्यकीय माहिती अपडेट ठेवता येते. रुग्णांचा केसपेपर गहाळ झाला, तरीही त्याची जी माहिती डॉक्टरांनी नोंदवली आहे, ती नोंद एचएमआयएस प्रणालीत कायम राहते, असे सांगण्यात आले.

## धारावीतील पुनर्वसित इमारतीची बांधकाम स्थिरता तपासा; रहिवाशांच्या भीतीनंतर उच्च न्यायालयाचे आदेश

■मुंबई। प्रतिनिधीः

परिसरात केल्या जाणाऱ्या बांधकामांमुळे झपाट्याने जमिनीची झीज होत आहे आणि त्यामुळे इमारतीच्या बांधकामाला धोका निर्माण झाल्याची भीती धारावी येथील पुनर्वसित इमारतीतील रहिवाशांनी याचिकेद्वारे उच्च न्यायालयात व्यक्त केली. त्याची दखल घेऊन या इमारतीच्या बांधकाम स्थिरतेची स्वतंत्र तपासणी करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. रहिवाशांच्या भीतीच्या पार्श्वभूमीवर इमारतीच्या बांधकाम स्थिरतेची तातडीने तपासणी करणे आवश्यक आहे, असेही न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने उपरोक्त आदेश देताना प्रामुख्याने स्पष्ट केले. आर्किटेक्ट्स शेटगिरी अँड असोसिएट्स आणि जीएम आर्क



प्रायव्हेट लिमिटेड यांचा समावेश असलेल्या समितीने १ ऑक्टोबर रोजी इमारतीच्या जागेची पाहणी करावी. तसेच, रहिवाशांनी व्यक्त केलेल्या भीतीनुसार जमिनीची झीज होते आहे का ? याची पाहणी करून नुकसानाचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. या तपासणीच्या वेळी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (झोपु) कार्यकारी अभियंत्यानी उपस्थित राहावे, असे आदेशही न्यायालयाने प्रकरणाची सुनावणी ७ ऑक्टोबर रोजी ठेवताना दिले.

धारावी येथील शीव-वांद्रे जोडमार्गावरील १५ मजली कामराज नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेने ही याचिका केली आहे. तसेच, सोसायटीच्या शेजारच्या भूखंडावर २१ मजली फ्री-सेल इमारतीचे बांधकाम सुरू केल्यानंतर जमिनीची झीज होऊन आपल्या इमारतीच्या बांधकामाच्या स्थिरतेचा प्रश्न निर्माण झाल्याचा दावा केला. याचिकाकर्त्यांच्या इमारतीला जुलै २०२२ मध्ये झोपु प्राधिकरणाने अंशतः निवासी दाखला दिला होता. तथापि, सोसायटीच्या बाजूच्या भूखंडावर २१ मजली इमारतीच्या बांधकामासाठी जमीन उत्खननाचे काम सुरु झाल्यानंतर सोसायटीच्या स्थिरतेला धोका निर्माण झाला. जमिनीच्या या उत्खननामुळे परिसरातील जमिनीची झपाट्याने झीज होत असल्याचा दावाही याचिकाकर्त्या रहिवाशांनी केला आहे.

याचिकेनुसार, सोसायटीच्या मुख्य प्रवेशद्वारावरील फरशी एका ठिकाणी सुमारे ४० इंच, तर काही ठिकाणी दीड फूट खोल गेली आहे. उत्खननामुळे जमिनीची झपाट्याने झीज होत असून त्यामुळे इमारतीच्या पायाला धोका निर्माण झाला आहे. सतत पाणी साचल्याने हा परिसर अपघातप्रवण देखील बनला असल्याचेही याचिकेत म्हटले आहे.

## मुंबई महानगरातील विकास कामांना ९५४ कोटींचा 'बुस्टर'



■मुंबई। प्रतिनिधीः

राज्य सरकारने मुंबई महानगरात १ टक्का अतिरिक्त मुद्रांक शुल्क लावून गोळा केलेल्या महसुलातील ९५४ कोटी रुपये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) दिले आहेत. त्यामुळे मुंबई महानगरातील पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे कर्जबाजारी झालेल्या एमएमआरडीए काहीसा दिलासा मिळाला आहे.

आता या प्राधिकरणाच्या प्रकल्पांच्या कामांसाठी निधीची चणचण काहीशी दूर होणार आहे. तर, भुयारी मेट्रो ३ मार्गिका उभारणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला राज्य सरकारने २०१ कोटी रुपये दिले आहेत. राज्य सरकारने मुंबई आणि महानगरातील पायाभूत प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध व्हावा, म्हणून २०१९ मध्ये १ टक्का अतिरिक्त मुद्रांक शुल्क लागू केले. त्यामाध्यमातून एमएमआरडीएला सप्टेंबर २०१४ पर्यंत ५,४८० कोटी रुपये एवढा महसूल मिळणे अपेक्षित होते. त्यानुसार एमएमआरडीएने हा निधी मिळावा, यासाठी राज्य सरकारकडे पत्रव्यवहार केला होता. आता टप्प्याटप्प्याने यातील काही निधी देणे राज्य सरकारने सुरू केले आहे. आता ९५४ कोटी देण्याचा निर्णय गुरुवारी घेण्यात आला, असे एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. ...म्हणून तिजोरीत खडखडाट - मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे घेतल्याने एमएमआरडीएच्या तिजोरीत खडखडाट झाला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००○१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com